स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयास पीएच. डी. **(Ph. D.)**
पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा **(Synopsis) .**

''महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पातील उत्पन्न व खर्चाचा अभ्यास''
(2010 ते 2020)

– संशोधक विद्यार्थी –

शिंगे राजू दिलीप

(स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)

– मार्गदर्शक –

डॉ. शिवाजी पाते

(सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी)

– संशोधन केंद्र –

अर्थशास्त्र विभाग
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी

मे, 2019

1) प्रस्तावना :–

एकविसाव्या शतकाच्या सुरवातीला जग ही एक बाजारपेठ म्हणून निर्माण व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहेत. या प्रयत्नातून एकमेकांच्या सहकार्याने एकमेकांचा आर्थिक विकास व्हावा हा उद्देश आहे. एकत्र येवून एकमेकांच्या गरजा पूर्ण करून विकासाला चालना मिळावी हा सुध्दा हेतू आहे. जागतिक पाताळीवर आर्थिक विकासाच्या बाबतीत अनेक देश एकमेकांवर अवलंबून आहेत. त्या देशातील वाईट घटनांचा त्या देशाच्या उत्पन्न व विकासावर परिणाम होत असतो. कोणत्याही देशाच्या विकासामध्ये त्या देशाला विविध मार्गाने मिणारे उत्पन्न महत्वाची भूमिका बजावत असते. शासन त्यांच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी उत्पन्नाचा योग्य विनियोग करीत असते. जर खर्चाच्या तुलनेत उत्पन्न अपुरे असेल तर शासन खर्च व उत्पन्नातील तफावत दूर करण्याचे अनेक उपाय शोधत असते असे मार्ग शोधत असताना ते उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करतात तसेच सार्वजनिक कर्जाचाही आधार घेतला जातो.

महाराष्ट्र हा फुले, शाहू व आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. कारण महाराष्ट्राला या तीन समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे.

सन 1970 च्या दशकातील आर्थिक धोरणामुळे महाराष्ट्र राज्य भारतातील अग्रगण्य औद्योगिक राज्य बनले. आर्थिक क्षेत्रात पहिला क्रमांक मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि प्रगतशील पुरोगामी अशा राज्यापैकी ते एक आहे. महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासामध्ये राज्याला विविध मार्गांनी मिळणारे उत्पन्न महत्वाची भूमिका बजावते कारण मिळालेले उत्पन्न शासन विविध विकासात्मक व लोककल्याणकारी कार्यावर खर्च करते. एकूण राष्ट्रीय उत्पान्नापैकी 13 टक्के महाराष्ट्राचे योगदान आहे. त्यामुळे राज्याला विविध मार्गांनी मिळणारे उत्पन्न व विविध बाबींवर होणारा खर्च राज्याच्या विकासावर दूरगामी परिणाम करत असताता. परंतू महाराष्ट्रा सारख्या प्रमाणात आर्थिक विकास होवू शकला नाही. हा विकास उत्पन्न व खर्चातील तफावतीमुळे झाला आहे. महाराष्ट्र भारतातील दूसरे सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य आहे. महाराष्ट्राला मिळाणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी 46 टक्के हिस्सा कृषी व त्यासंबंधीत उद्योगातून मिळतो.

अलिकडील काळात राज्याच्या एकूण उत्पनात झालेल्या वाढीबरोबर एकूण खर्चातही वाढ झालेली आहे. वाढते शहरी करण, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी होणारा खर्च, कल्याणकारी योजना, लोकप्रतिनीधी व कर्मचारी यांचे पगार व भत्ते, निवडणूकीसाठी होणारा मोठया प्रमाणावरील खर्च, सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे होणारा खर्च अशा विविध बाबींवरील खर्चामुळे राज्याच्या खर्चात वेगाने वाढ झाली आहे. ज्याप्रमाणे राज्याच्या सार्वजनिक खर्चात वाढ झाली त्याप्रमाणे राज्याच्या उत्पन्नात पुरेशी वाढ झाली नाही. उत्पन्न व खर्चातील दरी

दूर करण्यासाठी राज्य शासनाला कर वाढ किंवा कर्जाचा आधार लागतो. सन 2000–2001 मध्ये राज्याचे उत्पन्न हे 2,43,584 लाख कोटी रूपये होते. काळाच्या ओघात राज्याच्या उत्पन्नाबरोबर खर्चातही वाढ होवून ते सन 2019–20 साल 3,14,489 लाख कोटी रूपये होते व खर्च 3,34,274 लाख कोटी रूपये चा अंदाज व्यक्त केला आहे. म्हणजेच हा अर्थसंकल्प 11,784 कोटी रूपये महसूली तुटीचा होता एकंदरीत यावरून असे लक्षात येते की, राज्याच्या सार्वजनिक जबाबदारी मध्ये वाढ झाल्यामुळे उत्पन्नाच्या तुलनेत खर्चात वेगाने वाढ झाली आहे. या खर्चातील वेगवान वाढीमुळे सध्या राज्यावर 4,31,807 लाख कोटी रूपये कर्ज आहे. यावरून असे लक्षात येते की, राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्या राज्याचे उत्पन्न महत्वाची भममिका बजावत असते. जर उत्पन्न समाधानकारक असेल राज्याचा सुनियोतित विकास साध्य करता येतो त्यामुळे राज्याचा सार्वजनिक जबाबदारी होणाऱ्या वाढीबराबबरच उत्पनन वाढीचे ही विविध मार्ग शोधणे आवश्यक आहे. कारण उत्पन्न ही बाब विकासामध्ये महत्वाची भममिका बजावते.

2) संशोधन विषयाचा अर्थ :–

अ) उत्पन्नाचा अर्थ –

विशिष्ट आर्थिक वर्षात शासनाला विपिध मार्गाने मिळालेले उत्पन्न म्हणजे सार्वजनिक उत्पन्न होय. केंद्र व राज्य सरकारांना कर व करेत्तर अशा दोन मार्गानी महसूल मिळतो. मात्र केंद्र व राज्यसरकारांच्या एकूण महसूलातील कर महसूलाचा वाटा मोठा आहे. नियोजन काळापासून केंद्र व राज्य सरकांराच्या महसूलात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

केंद्र सरकारला उत्पन्न व खर्च यावरील कर मालमत्ता व भांडवली व्यवहारातील कर आणि वस्तु व सेवांवरील कर यापासून उत्पन्न मिळते. भारतात केंद्र सरकार व राज्या सकरकार यांना उत्पनाची वेगवेगळी साधने आहेत. घटक राज्यांना कर, सहायक अनुदाने व करेत्तर उत्पन्न अशा मार्गांनी उत्पन्न मिळते तसेच केंद्रीय करातील वाटाही राज्यांना मिळतो. केंद्र व राज्य सरकारला मिळाणारा कर हो महत्वाचा स्त्रोत आहे.

ब) खर्चाचा अर्थ –

विशिष्ट आर्थिक वर्षात शासनाने केलेला विविध बाबींवरील खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय. देशातील केंद्र व राज्या सरकाकर हे वेगवेगळया बाबींवर खर्च करीत असते. लोकांची आर्थिक व सामाजिक कल्याण योजला, परकीय आक्रमनापासून त्याचे संरक्षकण करणे. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, न्याय व्यवस्था अशा

वेगवेगळया कारणासाठी सरकारकडून खर्च केला जातो. या वेगवेगळया बाबींवर सरकारकडून केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

अलीकडील काळात सरकारच्क्ष्या कल्याणकारी कार्यात वाढ झाल्याने सरकारच्या खर्चात वाढ झालेली आहे. केंद्र सरकारच्या खर्चाचे वर्गीकरण 1987—88 च्या अंदाजपत्रकापासून नवीन पध्दतीने करण्यात येत आहे. नवीन वर्गीकरणानुसार सार्वजनिक खर्चाची विभागणी योजना खर्च आणि योजनेत्तर खर्च या दोन प्रकारात केली जाते.

1) योजना खर्च —

केंद्रीययोजनांसाठी करण्यात योणाऱ्या खर्चाचा म्हणजे शेती, ग्रामिण विकास, जलसिंचन, पूरनियंत्रण, ऊर्जा, उद्योग आणि खाणी, वाहतुक व दळाणवळण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाचा समावेश योजना खर्चात होतो.

2) योजनेत्तर खर्च —

केंद्र सरकारच्या योजनेत्तर खर्चाची अ) महसूली खर्च ब) भांडवली खर्च या दोन प्रकारात विभागणी केली जाते.

अ) महसूली खर्च — केंद्र सरकारच्या महसूली खर्चात संरक्षाणावरील महसूली खर्च, व्याज देणे, अन्न, खते व निर्यात, प्रोत्साहनासाठीची अनुदाने, शेतकऱ्यांना कर्ज माफी, पोलिस, पेन्शन व इतर सर्व सामान्य सेवा, शेती, उद्योग, ऊर्जा, वाहतुक व दळाणवळण, विज्ञान आणि तंत्रज्ञान इत्यादी आर्थिक सेवा आणि शिक्षण, आरोग्य, प्रसारण इत्यादी सामाजिक सेवा या वरील खच्र्ााचा समावेश महसूली खर्चात होतो.

ब) भांडवली खर्च — केंद्र सरकारच्या भांडवली योजनेत्तर खर्चात संरक्षणावरील खर्च, सार्वजनिक उद्योग संस्थांना कर्जे, राज्ये व केंद्रशाशित प्रदेशांना दिलेली कर्जे आणि परकिय सरकारांना दिलेली कर्जे यांचा समावेश होतो.

3) संशोधन विषयाचे महत्व —

कोणत्याही देश किंवा राज्याची उत्पन्न व खर्चाची स्थिती ही त्यांच्या अर्थसंकल्पावरून येते. अर्थसंकल्प हा विकासाचा आरसा असतो. कोणत्याही राज्याला मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च हा राज्याच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो. जर उत्पन्नच्या मानाने र्ख कमी असेल तर त्यांचे चांगले परिणाम त्या राज्याच्या विकासावर दिसून येतील. त्या राज्याच्या उत्पनात तर तफावत असेल तर विकासाची गती मंदावून त्याचे अनिष्ट

परिणाम होतील. महाराष्ट्रामध्ये सन 2000–01 ते 2019–20 या कालावधीमध्ये उत्पन्न व खर्चामध्ये नेमके कसे बदल होत गेले व त्यांचा महाराष्ट्राच्या विकासावर कसा परिणाम झालाकृकोणत्याही राज्याच्या विकासामध्ये उत्पन्न हा घटक महत्वची भूमिका बजावतो. अलिकडील वेगवान युगात शाश्वत विकास करण्यासाठी पुरेशी उत्पन्नची साधने आवश्यक आहेत. राज्याचा अर्थ व्यवस्थेमध्ये उत्पन्न व खर्चामध्ये ताळमेळ असणे आवश्यक आहे. जर उत्पन्न व खर्चामध्ये तफावत असेल तर त्यांचा राज्याच्या विकासावरती परिणाम होतो.

4) संशोधन विषयाची निवड :–

सध्या आधुनिक महाराष्ट्राची भूमिका वेगवेगळया कार्याच्या अनुषंगाने वाढत आहे. त्यानुसार वेगवेगळया बाबींवर होणारा खर्च वाढत आहे. खर्च व उत्पन्नतील तफावतीमुळे अर्थसंकल्पीय तूट वाढत आहे. आधुनिक महाराष्ट्रासमोरील ही एक गंभीर आर्थिक समस्या आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या उत्पन्न व खर्चाचा कल तपासून त्याचा राज्याच्या विकासावर झालेला परिणाम पाहण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

5) संशोधनाची उद्दिष्टे :–

1) महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाचा थोडक्यात आढावा घेणे.

2) महाराष्ट्राच्या उत्पन्न व त्यांच्या विविध स्त्रोतांचा अभ्यास करणे.

3) महाराष्ट्राच्या सार्वजनिक खर्चाचा अभ्यास करणे.

4) महाराष्ट्राचे उत्पन्न आणि खर्चाचा तुलनात्मक अभ्यास.

5) महाराष्ट्राच्या सार्वजनिक कर्जाचा अभ्यास करणे.

6) महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय तुटीचा अभ्यास करणे.

7) महाराष्ट्राच्या उत्पन्न व खर्चातील तफावतीच्या कारणांचा शोध घेवून यावर निष्कर्ष व शिफारशी सुचविणे.

6) संशोधनाची गृहीते :–

1) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये उत्पन्न आणि खर्चाची भूमिका महत्वपूर्ण आहे.

2) महाराष्ट्र राज्याचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहेत.

3) महाराष्ट्राच्या सार्वजनिक खर्चातील वाढ ही उत्पन्नतील वाढीपेक्षा जास्त आहे.

4) महाराष्ट्रातील अर्थसंकल्पीय तूट वाढत आहे.

5) महाराष्ट्रावरील सार्वजनिक कर्ज दिवसेंदिवस वाढत आहे.

7) संशोधन पध्दती :–

सदरील संशोधन हे मूलभूत दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारीत आहे. दुय्यम माहिती स्त्रोत विविध पुस्त्के, मासिके आणि सरकारी प्रकाशन, सामाजिक व आर्थिक आणि महाराष्ट्र राज्य सांखिकी विभागाची सामग्री महाराष्ट्र राज्याचे विविध अर्थसंकल्प, आर्थिक पाहणी अहवाल, केंद्र व राज्य स्तरावरील विविध सरकारी प्रकाशने, विविध संशोधन साहित्य इत्यादीद्वारे संग्रहीत केली जाईल. संशोधक संशोधन अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करेल.

SPSS 21 वी आवृत्तीच्या सहाय्याने सर्व माहितीचे विश्लेषण केले जाईल. जी अधिकतर सामाजिक विज्ञानामध्ये सांखिकीय विश्लेषणासाठी वापरली जाते. अभ्यासाच्या उद्देशानुसार माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणासाठी सरासरी वृध्दीदर, निर्देशांक, सहसंबंध, प्रमाप विचलण, विचरण, गुणक, आणि इतर चाचण्यांचा वापर माहितीच्या उपलब्धतेनुसार आणि उद्दिष्टयाच्या अनुसार केला जाईल.

8) संशोधन समस्या :–

एखाद्या राज्याला विविध मार्गाने मिळणारे उत्पन्न व विविध बाबींवर होणारा खर्च हा त्या राज्याच्या विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावत असतात. तसेच राज्याच्या विकासावर दूरगामी परिणाम करीत असतात. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्न व खर्चातील तफावत ही दिवसेंदिवस वाढत आहे. राज्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने गंभीर व चिंतनीय बाब आहे. म्हणून ही समस्या संशोधनासाठी घेतली आहे.

9) संशोधनाचा कालावधी, व्याप्ती व मर्यादा :–

महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करताना त्याचा कालावधी हा सन 2019–2020 असा राहील. तसेच त्याची व्याप्ती ही महाराष्ट्रा पुरती असेल व अर्थसंकल्पापुरती मर्यादित असेल.

10) प्रकारणांची रूपरेषा :–

1) प्रस्तावना

2) महाराष्ट्र राज्याची अर्थ व्यवस्था

3) संशोधन साहित्याचा आढावा.

4) महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न

5) महाराष्ट्र राज्याचा सार्वजनिक खर्च

6) महाराष्ट्र राज्याची अर्थसंकल्पीय तुट व सार्वजनिक कर्ज

7) निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ आणि ग्रंथ सूची :–

वेबसाईडट्स –

1) www.maharashtra.gov.in
2) www.wikipedia.org
3) www.researchgate.net
4) www.mahadesh.maharashtra.gov.in

अहवाल –

1) महाराष्ट्र बेजेट विश्लेषण 2010–11 ते 2019–20

2) महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2010–11 ते 2019–20

शिंगे राजु दिलीप

संशोधक विद्यार्थी

स्वमी रामानंद तीर्थ मराठावाड विद्यापीठ,

नांदेड